महाराष्ट्र पोलीस

# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र



०७१८४ - २५४७०२ sp.bhandara@gov.in / pilcb.bhandara@gov.in

जा.क्र. जनसंपर्क कक्ष/वार्तापत्र/ ४६८ /२०१८ पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा दिनांक ३१/०८/२०१८

## विशेष वार्तापत्र

## घरफोडीच्या वेगवेगळया गुन्हयातील दोन आरोपी अटक

**पोलीस स्टेशन लाखांदुर** अपराध क्र. १३८/१८ कलम ४५७, ३८० भांदवि मधील फिर्यादी नामे शेखर मधुकर मेंढे रा. ढोलसर यांनी दिनांक २५/०८/२०१८ ला येवुन पोलीस स्टेशनला तक्रार दिली की, दिवसा दरम्यान त्यांचे घराचे दरवाज्याचे कुलुप तोडुन कोणीतरी अज्ञात चोराने सुटकेस मध्ये ठवेलेले ९,५०० रुपये चोरीस केलेले आहेत. त्याचप्रमाणे अपराध क्रमांक १३९/१८ कलम ४५७, ३८० भादवि मधील फिर्यादी नामे वासुदेव अभिमान जगझापे रा. ढोलसर यांनी दिनांक २४/०८/२०१८ चे ०९.०० ते दुपार दरम्यान कोणीतरी अज्ञात ईसमाने घराच्या दरवाज्याची कुंडी उघडून दरवाज्यातुन घरात प्रवेश करुन सुटकेस मध्ये ठवेलेले सोन्याचे कानातील टॉप्स किंमती ९,०००/–रु. चे व रोख रक्कम ५,०००/–रु. कोणीतरी अज्ञात चोराने चोरुन नेल्याची तक्रार दिली होती. त्याचप्रमाणे अपराध क्र. १४०/२०१८ कलम ४५७,३८० भांदवी मधील फिर्यादी नामे अशोक बहीराम पारधी वय ५० वर्ष रा. गांधी चौक लाखांदुर यांनी दिनांक २६/०८/२०१८ रोजी मजुरीचे कामाने बाहेर गेले असता दिवसादरम्यान कोणीतरी अज्ञात चोराने घराचा कुलुप तोडून घरात प्रवेश करुन पॉकीटमध्ये ठेवलेला सोन्याचा मंगळसुत्र १२ ग्रॅम, वजनाचा किंमती २०,००० रुपयाचा व नगदी १५० रुपये असा एकुण २०१५० चा माल चोरीस गेलेला होता. सदर चो–या ची गंभिर दखल जिल्हा पोलीस अधिक्षक विनीता साहू यांनी घेवुन उपविभागीय पोलीस अधिकारी पवनी श्री. प्रभाकर तिक्कस व ठाणेदार निशांत मेश्राम यांना आरोपीचा छळा लावण्याकरीता मार्गदर्शन केले. व गुन्हे उघडकीस आणण्याकरीता पतके नेमुन आरोपी अटक करण्याबाबत आवश्यक त्या सुचना दिल्या. त्यावरुन पोलीस निरीक्षक निशांत मेश्राम पोलीस स्टेशन लाखांदुर यांचे पथकाने माहीती काढले असता ग्राम ढोलसर येथे राहणारा इसम नामे घनश्याम ब्राम्हणकर वय ३५ वर्ष यांचा हालचाली संशयास्पद असल्याचे निर्दशनास आले. त्यास ताब्यात घेवुन ढोलसर येथील दोन्ही घरी कोणी नसल्याचे सुना मौका पाहुन चोरी केल्याची कबुली दिली. लाखांदुर येथील चोरीबााबत अधिक माहीती काढली असता ज्ञानेश्वर मोरेश्वर ठाकरे वय ३१ वर्ष रा. गांधी चौक लाखांदुर यांचेही हालचाली संशयास्पद दिसुन आल्या. त्यास ताब्यात घेवुन विचारपुस केली असता त्याने लाखांदुर येथे अशोक बेहराम पारधी यांचे घरी सुना मौका पाहुन चोरी केल्याचे कबुल केले. सदर गुन्हयात दोन्ही आरोपीतांना अटक करण्यात आली असुन आरोपीतानकडून गुन्हयात चोरीस गेलेला माल हस्तगत करण्यात येत आहे. आतापर्यत दोन्ही गुन्हयात अपराध क्रमांक अपराध क्र. १३८/१८ मध्ये १४५० रुपये नगदी, अपराध क्रमांक १३९/१८ मध्ये किंमती ९,०००/–रु. चे व रोख रक्कम ५,०००/–रु. अपराध क्र. १४०/२०१८ १५००रुपये नगदी जप्त करण्यात आलेला आहेत. गुन्हयात चोरीस गेलेला इतर माल आरोपी कडून जप्त करण्यात येत आहे. असे एकुण ३७,६१० रुपयाचा माल जप्त करण्यात आला. व इतर किंमती मुद्देमाल जप्त करण्यात येत आहे.

सदर कार्यवाही मा. पोलीस अधीक्षक भंडारा, विनीता साहू मा. अपर पोलीस अधीक्षक भंडारा रश्मि नांदेडकर, मा. उपविभागीय पोलीस अधिकारी सा. पवनी यांचे मार्गदर्शनात पोलीस स्टेशन पवनी चे ठाणेदार पोलीस निरीक्षक निशांत मेश्राम, पोलीस हवालदार लखन उईके, पोलीस शिपाई योगेश्वर वैरागडे, पोलीस शिपाई सचिन कापगते, पोलीस शिपाई मनिष चव्हाण, बिट अंमलदार पोलस नाईक दिलीप भोयर, पोलीस शिपाई दिलीप कठाणे महिला पोलीस वासंती बोरकर यांनी केली आहे. आरोपीतांनी चोरलेल्या असल्याचे कबुल केलेले असुन सदर चोरीस गेलेला माल हस्तगत करण्यात आला. व आरोपीतांना अटक करण्यात आले. पोलीस स्टेशन लाखांदुर येथील अधिकारी व कर्मचारी यांनी कसोटीने प्रयत्न करुन घरफोडी सारखे गंभिर गुन्हे उघडकीस आणुन माल व मुलजीचा शोध घेतला.

(जितेंद्र के आडोळे)
पोलीस उपनिरीक्षक
जनसंपर्क अधिकारी
संपर्क क्र. ९४०३१०९७२०

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.